पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ४/१२/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १६८५**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) चा माहे ऑक्टोंबर २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/५७२८ दि. २६/११/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १६८६**

मा.सौ.श्वेता चव्हाण व मा.ॲड्.अविनाश साळवे यांचे दि. २६/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र ६ ब, मधील गेनबा सोपनराव मोझे(लक्ष्मीनगर)शाळेची इमारत धोकेदायक झाल्यामुळे शाळा बंद अवस्थेत आहे. तरी शिक्षण मंडाळाच्या पत्रानुसार शाळेचे स्ट्रक्चर ऑडीट करण्यात आले. त्यामधील विद्यार्थ्यांना प्रभागातील दुस–या शाळेंमध्ये स्थालांतरीत करण्यात आले आहे. ज्या शाळेत स्थालांतरीत केले आहे त्या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वर्ग यांना अडचण निर्माण होत आहे.

सदर शाळेचे पुन:निर्माण करण्या आगोदर शाळे लगत डोंगरचा भाग असुन,सदर डोंगरचा भाग हा पावसाळयाच्या दिवसात मागील ३ ते ४ वर्षापासून कोसळत आहे. त्यामुळे पुढील काळात नविन शाळेचे बांधकाम हे चालु होण्यापुर्वी सदर डोंगराला गनायाटींग वॉल त्वरीत करण्यात यावे. जेणेकरुन बांधकाम करताना अडचण निर्माण होणार नाही.तसेच सदर शाळेच्या मैदानात स्थानिक व विद्यार्थ्यां सोबत कोणतीही दुर्घटना घडणार नाही.

तसेच यावर्षी गेनबा मोझे शाळे लगत असलेल्या डोंगराला गनाटींग वॉल करण्यासाठी फक्त सन २०१८–१९ मध्ये र.रुपये १८ लक्ष एवढी तरतुद उपलब्ध आहे.त्यामुळे सदर शाळे लगत असलेल्या डोंगराला गनाटींग वॉल करण्यासाठी ७२ ब अन्वये दरवर्षी लागणारी तरतुद उपलब्ध करुन द्यावी.

**विषय क्र. १६८७**

मा.हिमाली कांबळे व मा.उमेश गायकवाड यांचे दि. २७/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२१ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ३६,५०,०००/- लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, पान क्र. २१८, अ.क्र.४, CE20C541, हडपसर शुटिंग रेंज येथे प्रकाश व्यवस्था करणे. | ३६,५०,०००/- | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१) प्रभाग क्र.२१ अ मध्ये विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे.<br>२) प्रभाग क्र.२१ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयी तदनुंषीक कामे करणे.<br>३) प्रभाग क्र.२१ अ मधील विविध ठिकाणी पोल व दिवे बसविणे.<br>४) प्रभाग क्र.२१ अ मध्ये हायमास दिवे बसविणे. | <br>---<br><br>---<br>---<br>--- | <br>१०,००,०००/-<br><br>१०,००,०००/-<br>१०,००,०००/-<br>६,५०,०००/- |

**विषय क्र. १६८८**

मा.साईनाथ बाबर यांचे दि. २८/११/२०१८ चे पत्र.

आर्किटेक्ट पंडित जोशी ॲण्ड असोसिएटस हे पुण्यात अनेक वर्षापासून कार्यरत आहेत. तरी पंडित जोशी ॲण्ड असोसिएटस या संस्थेस पुणे महानगरपालिकेचे आर्किटेक्ट पॅनेलवर समाविष्ट करुन घेणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. १६८९**

मा.सौ.वृषाली चौधरी यांचे दि. २८/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३१क, मध्ये अत्याधुनिक पध्दतीचे ( स्टील ) पी.एम.पी.एम.एल.चे बस थांबे उभारणेसाठी रू.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,शहरातील वाहतूक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे. ( यादी क्र.एसटी २ )<br>१) पान क्र.२१६, अ.क्र.११८, प्रभाग क्र.३१क, मधील विविध ठिकाणी रोड क्रॉसिंग रेडे स्टिंयल बसविणे. | १० लाख | --- |
| २) पान क्र.२१६, अ.क्र.११९, प्रभाग क्र.३१क, मधील विविध ठिकाणी स्पीड ब्रेकर ( रमलर ) बसविणे. | ५ लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम-** | | |
| प्रभाग क्र. ३१क, मध्ये अत्याधुनिक पध्दतीचे (स्टील) पी.एम.पी.एम.एल.चे बस थांबे उभारणे | --- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६९०**

मा.सौ.दिशा माने यांचे दि. २८/११/२०१८ चे पत्र.

सहकानगर २ मध्ये फुटपाथ दुरुस्ती व नविन करणे विषयक कामे करणे व प्रभाग क्र.३५ अ मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, पान क्र. २७०, अ.क्र.१५, बजेट कोड नं. सीई१९अे१५४/एसएच१-२१५, प्रभाग क्र.३५ अ मधील तळजाई बायोगॅस प्रकल्प चालु करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१) सहकानगर २ मध्ये फुटपाथ दुरुस्ती व नविन करणे विषयक कामे करणे<br>२) प्रभाग क्र.३५ अ मध्ये विविध विकास कामे करणे | <br>---<br>--- | <br>१० लाख<br>१० लाख |

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १६९१**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १/११/२०१८ ते दि.१५/११/२०१८ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ-४/७२८ दि.२६/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १६९२**

स्थानिक निधी लेखापरिक्षण संचनालय, पुणे महानगरपालिका लेखापरिक्षण शाखेमार्फत पुणे महानगरपालिकेचे सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षातील पुणे महानगरपालिका लेखापरिक्षण अहवाल मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७४६ दि.२८/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १६९३**

स्थानिक निधी लेखापरिक्षण संचनालय, पुणे महानगरपालिका लेखापरिक्षण शाखेमार्फत पुणे महानगरपालिकेचे सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षातील पुणे महानगरपालिका लेखापरिक्षण अहवाल मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७४७ दि.२८/११/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १६९४**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर यांचे दि. १/११/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागामार्फत पुणे शहरामध्ये प्रत्येक वर्षी नवे पथ करणे,जुने पथ दुरूस्ती करणे,डांबरीकरण करणे किंवा रस्ते कॉक्रीटीकरण करणे,फुटपाथ करणे या कामा करीता तरतुद केलेली असते. हे रस्ते झाल्यानंतर त्यांची देखभाल व दुरूस्ती ही त्या संबंधित ठेकेदारांकडे २(दोन)वर्षापर्यंत असते. सामान्य पुणेकर नागरिकांना या रस्त्यावरची माहिती उपलब्ध होणे गरजेची आहे.या करीता जो रस्ता अर्थसंकल्पामध्ये झालेला आहे त्या संबंधित ठेकेदाराने त्या ठिकाणी फलक लावून तो रस्ता ज्या लोकप्रतिनिधीच्या पाठपुरावामुळे झालेला आहे. तसेच पथ विभागाच्या अधिकाऱ्याचे नाव व सदर कामाची पुढील दोन वर्षापर्यंत देखभाल व दुरुस्ती करणे असे नमुद करणे.

सदर कामासाठी किती बजेट तरतुद होती व किती खर्चिक पडली ,वर्क ऑर्डर कधी दिली,त्यांने काम कधी पुर्ण केले याची तारीख फलकावर लिहावी. त्याखाली संबंधित ठेकेदाराने आपल्या एजन्सीचे नाव,पत्ता,दुरध्वीनी क्रमांक अशी संपूर्ण माहिती दिल्याने नागरिकांना संबंधित कामाची संपूर्ण माहिती उपलब्ध होऊ शकेल.

संबंधित सर्व माहिती ही पथ विभागाच्या अधिकाऱ्यानी महानगरपालिकेच्या वेब साईटवरती प्रसिध्द करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/११/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६९५**

पुणे महानगरपालिका हद्दीत क्रीडा क्षेत्रास अधिक गतीने चालना मिळणेकरीता व पुणे शहराचा क्रीडा क्षेत्रात नावलौकिक होण्याच्या दृष्टीने मा.अति.महा.आयुक्त(वि) यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या पुणे महानगरपालिका सुधारित क्रीडा धोरण २०१८ (मसुदा) यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) जा.क्र. मआ/क्रीडा/३८१, दि. ०९/०८/२०१८ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. २३ दि.१६/१०/२०१८ विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/११/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १६९६**

पुणे पेठ बिबवेवाडी प्रभाग क्र.७० ब, स.नं.६८०/६८१ (पार्ट) येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक शाळेमधील कै. शकुंतला किसनराव शिंदे क्रीडा संकुलाचा बॅडमिंटन हॉल लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ७ निविदापैंकी सर्वात जास्त दर देणारे अ.क्र.१ चे निविदाधारक शिवराज शिक्षण संस्था, कृष्णाई प्लॉट नं ३२, लेक व्युव्ह कॉ.ऑप. सोसायटी सुखसागरनगर,पुणे-४६ यांनी देऊ केलेले वार्षिक भाडे र.रू. ४,३०,०००/-( र.रू. चार लाख तीस हजार फक्त) मनपाने निश्चित केलेल्या वार्षिक भाडे रक्कमेपेक्षा ८१.२४% ने अधिक रकमेची असल्याने त्यांची निविदा स्विकृत करणेस व निविदा अटी व शर्ती नुसार त्यांच्याबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्री.वि./५९५,दि.१५/१०/२०१८ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २६९ दि.२६/१०/२०१८ विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/११/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १६९७**

सन २०१७-१८ चे आर्थिक हिशोबाच्या जमाखर्चास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७३५ दि. २७/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १६९८**

मा.महापौर, मा.गटनेते भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष व मा.गटनेते शिवसेना यांचे कार्यालयात चहापान व खाद्यपदार्थ मागविणेत आले होते. त्याप्रित्यर्थ संबंधित बिलधारकाने बिले सादर केली असून सदरची बिले संबंधितास अदा करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील शेड्युल डी चॅप्टर ५ मधील कलम २(२)अन्वये व कलम (१)(ब)नुसार करारनामा न करता संबंधित अर्थशिर्षकावर बिले खर्ची टाकून संबंधितांस बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त जा.क्र. मआ/नस/७४१ दि. २८/११/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १६९९**

पीएमपीएमएल करिता खरेदी करावयाच्या ४०० सीएनजी, बीआरटी, नॉन एसी बसेस पैकी पुणे मनपा हिश्शाच्या २४० बसेस करीता आवश्यक र.रुपये १,१६,१७,०९,२००/- महामंडळाकडे टप्प्याटप्याने वर्ग करण्याकरिता खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त जा.क्र. मआ/मुअ(प्र)/७४२ दि.२८/११/२०१८ चे पत्र.

१) पुणे मनपा हिश्शाच्या २४० बसेस करीता आवश्यक र.रुपये १,१६,१७,०९,२००/- पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे टप्प्याटप्याने वर्ग करण्याकरिता मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार देणेस

२) पुढील आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये उर्वरित रक्कम उपलब्ध करुन देणेस

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**